जावक क्रमांक 4962/२०२३
खडक पोलीस ठाणे, पुणे.
दिनांक – १४/०७/२०२३

**प्रति,**
**मा. जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यालय**

प्रतिवेदक :- एल एन सोनवणे, सहा. पोलीस निरीक्षक, खडक पोलीस ठाणे, पुणे.
विषय :- अनोळखी मयत इसमाचा ताबे पोलीसांमार्फत शोध होणे बाबत.

महोदय,

खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर, अकस्मात मयत रजि.क्र. ८७/२०२३ दि.१३/०७/२०२३ मधील मयत इसम नामे एक अनोळखी पुरुष जातीचा इसम वय अंदाजे ४६ वर्षे, हा दिनांक पेशंट दि.२४/०६/२०२३ रोजी १३.०० वा. अस्वस्थ अवस्थेत टिळक रोड एच.पी पेट्रोल पंप समोर पुणे येथे मिळून आल्याने उपचारकामी ससून हॉ. पुणे येथे (१०८) ने डॉ. रुतुजा मो. ८८५५८००८२० यांनी त्यांना उपचारकामी ससून हॉस्पिटल पुणे वार्ड क्र. ०३ मध्ये ॲडमिट केले होते उपचारादरम्यान वॉर्डात त्यांना १२/०७/२३ रोजी २१.१५ वा मयत घोषित केले आहे. त्यांचा एम.एम.सी.नं १५६८०/२०२३ असा आहे. सदर मयत बॉडीचा दोन पंचासमक्ष दिसते परिस्थितीचा इन्क्वेस्ट पंचनामा केला, शवफॉर्म भरला, मयतास नक्की मरण कशाने आले हे समजुन येत नसल्याने मयताचे पोस्टमार्टेम होवुन ॲडव्हान्स सर्टिफिकेट मिळणेकामी मा.न्यायवैद्यकीय अधिकारी सो, ससुन डेडहाऊस पुणे यांचेकडे रिपोर्टाने पाठविली असता सदर मयताचे एम.एल.पी.एम.नं. ४०८४ /२०२३ अन्वये पोस्टमार्टेम होवुन ॲडव्हान्स सर्टिफिकेट प्राप्त झाले आहे. त्यामध्ये मयताचे मृत्युचे कारण "SEPTICEMIA" मुळे आले असल्याचे ॲडव्हान्स सर्टिफिकेटमध्ये नमुद आहे. मयताचे पोस्टमार्टेम वेळी त्याचे कोणी वारस नातेवाईक हजर नसल्याने त्याचे नाव पत्ता व त्याचे वारस नातेवाईकाचा शोध होणेकामी त्याची मयत बॉडी ससुन डेड हाऊस मधील शवागृहात राखुन ठेवलेली आहे. तरी खाली दिलेल्या त्याचे वर्णनावरुन त्याचे नाव पत्ता तसेच त्याचे वारस नातेवाईकाचा शोध होणेस विनंती आहे.


१)बेवारस अनोळखी इसमाचे वर्णन :- **एक बेवारस पुरुष इसम (बेगर असावा) त्याचे नाव व पत्ता महित नाही वय अंदाजे ४६ वर्षे, डोक्याचे केस काळे, रंगाने काळा सावळा, उंची ५०५फुट,अंगाने सडपातळ, नाक-सरळ सरळ उजवे हाताचे पोटरीवर बदाम व त्याचेमध्ये बाण व इंग्रजी "VASANTI" अस्पष्ट अक्षरे लिहलेली दिसत आहे.**

तरी सदरचे अनोळखी मयत इसमाचा ताबे पोलीसांमार्फत तपास होवुन तपासाचा परिणाम कळविण्यास विनंती आहे.

मार्फत
मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो.
खडक पोलीस स्टेशन पुणे

मा.सा.व्हावे.
दि.१४/०७/२०२३

लक्ष्मण नि. सोनवणे
सहा. पोलीस निरीक्षक
खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर



पोलीस निरीक्षक
खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर